नि. फौजदारी खटला क्र. <u>२७५/२०२१</u>
सरकार विरूद्ध समीर खान
**निशाणी १३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : रविंद्र अंबादास वाघमारे
वय : ५१ वर्षे,
धंदा : मजुरी,
राहणार : सोमवार वेस, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी आरोपीला ओळखत नाही. दि. ०४/०८/२०२१ रोजी पोलीसांनी मला अकोट शहर पोलीस ठाण्यात बोलवले होते. पोलीस ठाण्यात पंचनामा लिहुन तयार होता. मला पोलीसांनी त्यावर सही करण्यास सांगितले म्हणुन मी सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी अनु क्र. १ वर सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही.

२. माझे समक्ष पोलीसांनी जप्तीची कोणतीही कारवाई केली नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर देखील अनु क्र. १ वर माझी सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही. माझेसमक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त करण्यात आलेले नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

३. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/०८/२०२१ रोजी अकोट येथे शिवाजी विद्यालयाच्या बाजुला टाकुपरा भागात आरोपीच्या घरी पोलीसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी घटनास्थळाची पाहणी करून माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व तो वाचुन मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेसमक्ष आरोपीच्या ताब्यातुन

लोखंडी पात्याचा खंजर जप्त केला होता व त्याबाबत माझेसमक्ष जप्ती पंचनामा तयार केला व तो वाचुन मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. मो. जुनेद यांनी नाकारली**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २०.११.२०२५<br>
अकोट

(ए.ए. माळी)<br>
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>
(न्यायालय क्र. २)<br>
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.